| | |
|---|---|
| **MHNS**240011522020 | **नियमित दिवाणी दावा क्र.८२/२०२० मधील नि.क्र.०५ वरील आदेश.**<br>राजाराम दुबळु बहिरम व इतर<br>**विरूद्ध**<br>झेलाबाई आनंदा सोनवणे व इतर |

**निशाणी क्र.०५ वरील आदेश**

(आदेश पारीत दिनांक १३/११/२०२५)

प्रस्तुत दावा हा जाहीरनामा, निरंतर मनाई व अतिक्रमीत कब्जा तसेच दरम्यानचे उत्पन्न मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीने या दाव्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (*यापुढे याचा उल्लेख 'संहिता' असा करण्यात आला आहे* ) चे क्रम ३९, नियम १ व २ अन्वये दाखल केला असून या अर्जाव्दारे वादी हे प्रतिवादी विरूद्ध त्यांनी दाव्याच्या अंतीम निकालापावेतो गट क्र.४ व त्याचे पोटहिस्से/उपविभाग गट क्र.४/१ ते गट क्र.४/४ यांच्या संदर्भात वादींना वहिवाट करण्यास प्रतिवादींनी दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत अडथळा करू नये अशी तात्पुरती मनाई देण्यात यावी अशी विनंती केली आहे. अर्जाच्या पुष्ठ्यर्थ वादीने त्यांचे शपथपत्र सादर केले आहे.

**०२.** वादींच्या कथनानुसार मौजे दगडी साकोडे, ता. बागलाण, जि. नाशिक येथील गट क्र.४ व गट क्र.३ या शेतजमिनींबाबत वाद आहे. वादींची मालकी व वहिवाट गट क्र.४ या मिळकतीवर असुन गट क्र.४ हिचे ४/१ ते ४/४ असे चार पोटहिस्से/उपविभाग झाले असुन वादी क्र.३ यांच्या मालकी व वहिवाटीचे गट क्र.४/१ क्षेत्र ७७ आर. आहे. वादी क्र.४ यांच्या मालकी व वहिवाटीचे गट क्र.४/२ क्षेत्र ७५ आर. आहे. वादी क्र.१ यांच्या मालकी व वहिवाटीचे गट क्र.४/३ एकुण क्षेत्र १ हे. ५३ आर. आहे. वादी क्र.५ यांच्या मालकी व वहीवाटीचे गट क्र.४/४ क्षेत्र १ हे. ५० आर आहे. प्रतिवादी यांच्या मालकीची मिळकत गट क्र.३ क्षेत्र २ हे. ५५ आर ही आहे. वादी व प्रतिवादी यांच्या गट क्र.४ व गट क्र.३ या मिळकतींमध्ये पूर्व–पश्चिम असा नाला आहे. प्रतिवादींनी नाल्याच्या दक्षिण बाजूस म्हणजेच गट क्र.४ च्या हद्दीतून ६३ आर. क्षेत्रावर बेकायदेशीरपणे अतिक्रमण केले आहे. प्रतिवादींनी वादींच्या अनुपस्थितीत सन २०१८ मध्ये सदर अतिक्रमण केले

असून अतिक्रमीत भागात प्रतिवादींनी कुळीथ व उडीद इत्यादी पिके घेतली आहेत. वादींनी टी.आय.एल.आर. सटाणा कार्यालयाकडुन दि.२२/०२/२०१९ रोजी मोजणी करून घेतली व दि.०५/०३/२०१९ रोजी हद्द निश्चित झाली. सदर मोजणी नकाशानुसार प्रतिवादींनी वादींच्या ६३ आर. क्षेत्रावर अतिक्रमण केल्याची बाब स्पष्ट झाली आहे. वादींनी प्रतिवादींना अतिक्रमण काढून देण्याची अनेक वेळा विनंती केली, परंतु त्यांनी नकार देवुन शिवीगाळ व मारहाण केली. प्रतिवादी क्र.०३, ०९ ते १४ हे वादींना वारंवार त्रास देतात. म्हणुन वादींनी प्रतिवादींविरुध्द गट क्र.४ व त्याचे उपविभाग गट क्र.४/१ ते गट क्र.४/४ यांच्या संदर्भात वादींना वहिवाट करण्यास प्रतिवादींनी दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत अडथळा करू नये अशी तात्पुरती मनाई देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादी क्र.०३, ०९ ते १३ यांनी नि.क्र.२५ व नि.क्र.७८ कडे अनुक्रमे म्हणणे व कैफियत दाखल करुन वादीच्या अर्जास व दाव्यास प्रखर हरकत घेतली आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार वादींचा दावा हा बेकायदेशीर, खोटा असुन तो रद्द होण्यास पात्र आहे. दाव्यातील मिळकतींचे वर्णन, चतुःसिमा आणि पक्षकारांच्या महसुल नोंदी चुकीच्या व अपुरी असल्याने दावा तांत्रिकदृष्ट्या चालण्यास पात्र नाही. प्रतिवादींना वादी कथन करत असलेल्या मोजणीबाबत माहिती नसुन त्यांनी वादींच्या जमिनीवर ०.६३ आर. अतिक्रमण केले नाही. वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरुध्द केलेले आरोप पूर्णपणे खोटे असुन वादी स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नाहीत. वादींची गट क्र.४ ही जमीन मूळतः सोनु नथु भिल यांच्या नावावर होती व ते भिल समाजातील होते. वादी मात्र कोकणी समाजातील असल्याने त्यांचा वाद मिळकतीशी काहीही संबंध नाही. वादींनी बाबुराव यादव नावाच्या व्यक्तीच्या माध्यमातून खोटी माहिती देऊन बेकायदेशीरपणे फेरफार करून वाद मिळकत त्यांच्या नावावर घेतल्यामुळे वादी कायदेशीर मालक नाहीत आणि त्यामुळे त्यांना कोणताही दिलासा मागण्याचा अधिकार नाही. प्रतिवादींची गट क्र.३ ही मिळकत नाल्यापर्यंतच असुन वादींची गट क्र.४ ही मिळकत नाल्याच्या उत्तरेला आहे. सदर दोन्ही जमिनींच्या मध्ये मोठा नाला असल्याने वादी व प्रतिवादी यांची मिळकत एकमेकांना लागून नाही. त्यामुळे वादीचा अतिक्रमणाचे कथन चुकीचे आहे. वादी यांनी प्रतिवादी यांच्या अनुपस्थितीमध्ये चुकीच्या पध्दतीने एकतर्फी

केलेली मोजणी खोटी आहे. प्रतिवादी शांत, गरीब व पापभिरू स्वभावाचे असून वादी त्यांचा गैरफायदा घेऊन त्यांची जमीन हडप करण्याचा प्रयत्न करत आहेत. म्हणुन त्यांनी वादीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** वादीतर्फे श्री. आर.ए.पाटील यांनी नि.क्र.८० कडे दाखल केलेल्या लेखी युक्तीवादाचे वाचन केले. वादी यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठ्यार्थ एम.गुरुदास व इतर वि. रसराजन व इतर (२००७[१] बी. सी.जे ५०४, सुप्रिम कोर्ट) तसेच सुरेश शंकर रोकडे विरूद्ध म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई व इतर (२०१८ (६) एम.एच.एल.जे. ३५७) या न्यायनिवाड्यातील तत्वावर भिस्त ठेवलेली आहे. प्रतिवादी क्र.०३, ०९ ते १३ तर्फे श्री. एस.एस.शिंदे यांनी केलेला युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.०१ यांनी नि.क्र.२३ कडे कैफियत दाखल करुन वादीचा दावा मान्य केला आहे. उर्वरित प्रतिवादींविरुध्द दावा विना–कैफियत चालविण्यात आला आहे. सादर युक्तीवाद व दाखल कागदपत्रावरुन खालील मुद्दे उपस्थित झाले. मी, त्यांना खालीलप्रमाणे सकारण निष्कर्ष नोंदविला आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यासाठी सकृतर्शनी दावा त्यांच्या बाजूने आहे असे सिद्ध करतात काय ? | **नकारार्थी** |
| ०२. | वादी न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने झुकत आहे असे सिद्ध करतात काय ? | **नकारार्थी** |
| ०३. | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश न मिळाल्यास त्यांचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे सिद्ध करतात काय ? | **नकारार्थी** |
| ०४. | आदेश काय ? | **अर्ज नामंजुर करण्यात येतो.** |

**वादीतर्फे दाखल करण्यात आलेले कागदपत्रेः–**

**०५.** वादी यांनी नि.क्र.०३ लगत अ.क्र.१ ते ०४ कडे गट क्र. ४/३, ४/१, ४/२, ४/४ चे सातबारा उतारे, अनु क्र. ०५ कडे गट क्र.०३ चा सातबारा उतारा, अनु.क्र.०६ ते १० कडे गट क्र.५/१, ७, ५/२, २/२, १८/१ चा सातबारा उतारा तसेच अनु.क्र.११ ते १४ कडे फेरफार नोंद क्र.३३, १७४, २९२, ५२६ तसेच अनु.क्र.१५ ते १८ कडे प्लॉट रिपोर्ट, अनु.क्र.१९ कडे मोजणी नकाशा इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. वादी यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठ्यार्थ नि.क्र.२७ ते नि.क्र. २९ कडे सुरेश दत्तु गांगुर्डे, गोपळ दुबळु बहिरम, रामचंद्र गोविंदा गायकवाड यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र.०३, ०९ ते १३ यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठ्यार्थ कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत.

:: **का र ण मी मां सा** ::

**मुद्दा क्र.०१ बाबत :–**

**०६.** प्रस्तुत वाद प्रश्नात समाविष्ट असणारा पहिला घटक म्हणजे सकृत दर्शनी केस (prima–facie case) वादीच्या बाजुने आहे किंवा नाही. तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी वादीस प्रथमदर्शनी दावा त्यांच्या बाजूने असून न्यायाचा समतोल त्याच्या बाजूनेच आहे हे सिद्ध करुन प्रतिवादी विरुद्ध मनाई हुकूम न दिल्यास त्याचेच अपरिमित नुकसान होणार असून प्रतिवादीस जास्त हाणी होणार नाही या तीन्ही बाबी सिद्ध करणे आवश्यक असते. तुर्तातुर्त मनाई आदेश मिळवतेवेळी वादी यांना स्वतःची केस स्वतः सिध्द करावी लागते. सदर कामी वादी हे प्रतिवादी यांच्या बचावातील त्रुटीचा फायदा घेवु शकत नाहीत.

**०७.** मी वादीतर्फे दाखल केलेल्या वर नमुद न्यायनिवाड्यातील तत्व वाचुन पाहिले. एम.गुरुदास या न्यायनिवाड्यातील तत्वानुसार तुर्तातुर्त मनाई आदेश देतेवेळी प्रथमदर्शनी दावा, न्यायाच्या तराजूचा झुकाव तसेच कधीही न भरून येणारे नुकसान ह्या तीन बाबी अतिशय महत्वाच्या आहेत. सदर तिनही बाबींचा एकत्रित विचार करुन मनाई आदेश पारित करणे आवश्यक असल्याचे मत मा. सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे. तसेच सुरेश रोकडे या न्यायनिवाड्यातील तत्वानुसार तुर्तातुर्त मनाई आदेश पारित करणे ही विवेकाधीन सवलत (Discretionary relief) असुन त्याकरिता

प्रथमदर्शनी दावा, न्यायाच्या तराजूचा झुकाव तसेच कधीही न भरून येणारे नुकसान ह्या तीनही बाबींचे समाधान झाल्यास तुर्तातुर्त मनाई आदेश पारित करता येतो. वादीतर्फे दाखल केलेल्या न्यायनिवाड्यातील तत्वांच्या नुसार सदर तिनही बाबी वादी यांनी सिध्द केल्या किंवा कसे हि बाब पडताळुन पाहणे आवश्यक आहे. प्रस्तुत उभय पक्षकारांतील कथन पाहता वादी कथन करत असल्याप्रमाणे त्यांचे ६३ आर. अतिक्रमीत क्षेत्र हे प्रतिवादी यांच्या कब्जामध्ये आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीमधुन नाला गेला असल्याची बाब उभय पक्षकारांना मान्य आहे. वादीच्या कथनानुसार नि.क्र.०३ लगत अनु.क्र.१९ सोबत सादर आसलेल्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रतिवादींनी सदर अतिक्रमण केले आहे. वादी कथन करत असल्याप्रमाणे सदर मोजणी नकाशा अचुक आहे किंवा कसे तसेच कथित अतिक्रमण हे बेकायदेशिर आहे किंवा कसे हि बाब सखोल पुराव्याअंती निश्चित होवु शकते. सद्यस्थितीत सदर प्रतिवादी यांच्याविरुध्द मनाई आदेश पारित केला तर त्यांच्या हक्काचे उल्लंघन होवुन त्यांचे नुकसान होणार असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वादी यांना सकृत दर्शनी दावा आहे हि बाब सिध्द करता आली नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.०१ करिता नकारार्थी निष्कर्ष नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. ०२ बाबत</u> :–**

०८.　प्रस्तुत वाद प्रश्नात समाविष्ट असलेला दुसरा घटक म्हणजे न्यायाचा समतोल (balance of convenience) म्हणजेच तुलनात्मक अपाय अथवा पक्षकाराची होणारी गैरसोय होय. न्यायाचा समतोल कोणाच्या बाजूने आहे हे निश्चित करण्यासाठी अंतरिम मनाई हुकूमाचा अर्ज नामंजुर केल्यास वादीस किती अपाय होईल याबाबी सह सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीस किती अपाय होईल याबाबीचा देखील विचार करणे आवश्यक असते. प्रस्तुत **वादप्रश्न क्र.०१** चे निष्कर्षानुसार वादी सकृत दर्शनी केस त्यांच्या बाजुने असल्याचे शाबीत करण्यास असमर्थ ठरले आहेत. सध्यस्थितीत प्रतिवादी यांच्याविरूद्ध मनाई आदेश पारीत केला तर वादी पेक्षा जास्त प्रमाणात प्रतिवादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब, न्यायाचा समतोल हा वादीच्या लाभात असल्याचे शाबीत करणेस वादीस अपयश आले असल्याने मी, **मुद्दा क्र.०२ करीता नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ०३ बाबत</u> :–**

**०९.** प्रस्तुत वाद प्रश्नात समाविष्ट असणारा तिसरा घटक अपरिमित नुकसान (irreparable loss) म्हणजे पैशाने कधीही न भरुन येणारी हाणी होय. वादी सकृत दर्शनी दावा त्याचे बाजुने तसेच न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजूने असल्याचे सिद्ध करण्यास असमर्थ ठरले आहेत. वरील विवेचनार्थ वादी यांचा अर्ज मंजुर केल्यास त्यांच्यापेक्षा जास्त प्रमाणात हाणी प्रतिवादी यांना होईल. म्हणुन प्रस्तुत अर्ज नामंजुर केलेस वादीचे अपरिमित असे नुकसान होणार नाही. वरील कारणास्तव मी, **मुद्दा क्र.०३ करीता नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.०४ बाबत</u> :–**

**१०.** सकृत दर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरिमित नुकसान या तीन्ही संज्ञा केवळ अलंकारीक भाषेचा नमुना नसुन सदर तीन्ही संज्ञांना विशिष्ट महत्व आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सर्व तिन्ही संज्ञा वादीच्या लाभात असल्याने शाबीत करण्यास वादीस अपयश आले असल्याने वाद प्रश्न ०१ ते ०३ चे निष्कर्ष त्यानुसार नकारार्थी नोंदविण्यात आले आहेत. वरील सर्व कारणास्तव वादी यांनी दाखल केलेल्या वर नमुद न्यायनिवाड्यांचा संपुर्ण आदर राखुन त्यामधील तत्व याठिकाणी वादी यांच्या हक्कामध्ये लागु होत नाही असे माझे मत आहे. सबब मी, **मुद्दा क्र.०४** करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

**:: <u>आ दे श</u> ::**

**०१.** अर्ज निशाणी क्र.०५ नामंजुर करण्यात येतो.

**०२.** अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करावा.

SHIPKULE CHARUDATTA

Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2025.11.13 17:07:00 +0530

**ठिकाण : सटाणा.**

**दिनांक: १३/११/२०२५.**

**( चारुदत्त उद्धव शिपकुले )**

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सटाणा.**